प्रसिद्धी : दरमहा १५ तारखेस
दि यशवंत बँक फलटणचे मुखपत्र
RNI No. MAHMAR/2010/31891

# यशवंत इन हाऊस

YASHWANT IN HOUSE

• फलटण जि. सातारा. • वर्ष १२ वे • अंकः ३ रा • मार्च २०२२ • पृष्ठ १६ • किंमत : रूपये ५/-

## ठेव संकलनाची उत्तुंग भरारी
## ठेव संकलन अभियानाद्वारे झाले
## एकाच महिन्यात रूपये १० कोटी ठेव संकलन




## यशवंत कर्मचाऱ्यांची दिवाळी आधीच दिवाळी

उद्दीष्ट पूर्ण करणाऱ्या कर्मचाऱ्यांना भरघोस बोनस व वेतनवाढीचा लाभ

**सर्व ठेवीदारांचे मनःपूर्वक आभार..!**

अंतरंग

१) मुखपृष्ठ | २) उद्दिष्ट पूर्ती | ३) मनाचे श्लोक | ४/५) बँकिंग साक्षरता | ६) अभिवादन | ७/८) ठेव संकलन अभियान | ९) सामाजीक उपक्रम
१०) कथा | ११) वेबसाईट उद्घाटन | १२/१३) यशवंत महोत्सव | १४) जागतिक महिला दिन | १५) ठेव योजना | १६) कर्ज योजना



समर्थ रामदास स्वामी रचित

# ॥मनाचे श्लोक॥

समर्थांच्या मते माणसाने दुसऱ्याला उपदेश करण्यापेक्षा स्वतः सुधारावे, स्वतःमध्ये बदल घडवून आणावा आणि इतरांना मदत करावी. जीवन आनंदाने कसे जगावे आणि सर्वांशी प्रेमाने कसे वागावे याची कला शिकविणारा ग्रंथ म्हणजे मनाचे श्लोक होय. समर्थ रामदास रचित

"मनाचे श्लोक" अर्थासहित मालिका - भाग १८

*जय जय रघुवीर समर्थ ।*

### श्लोक क्र. ९१

नको वीट मानूं रघूनायेकाचा ।
अती आदरें बोलिजे राम वाचा ॥
न वेचे मुखीं सांपडे रे फुकाचा ।
करी घोष त्या जानकीवल्लभाचा ॥

हे मना, भगवंताचा कंटाळा करू नकोस. अत्यंत आदरपूर्वक वाणीने रामनाम घे. त्यात तुझे काहीही खर्च होत नाही. नाम घेतल्यामुळे फुकटात भगवंताचा लाभ होतो. म्हणून त्याच्या नामाचा जयघोष करावा.

### श्लोक क्र. ९२

अती आदरें सर्व ही नामघोषें ।
गिरीकंदरें जाइजे दूरि दोषें ।
हरी तिष्ठतु तोषला नामतोषें ।
विशेषें हरा मानसीं रामपीसें ॥

जो कोणी अत्यंत आदराने नामाचा गजर करतो, त्याचे सर्व दोष गिरिकंदरी पळून जातात. जेथे नामाचा गजर होत असतो, तेथे भगवंत हा संतुष्ट होऊन उभा असतो. महादेवाच्या मनाला तर राम-नामाचे वेड लागले आहे.

### श्लोक क्र. ९३

जगीं पाहतां देव हा अन्नदाता ।
तया लागली तत्वता सार चिंता ।
तयाचें मुखीं नाम घेतां फुकाचें ।
मना सांग पां रे तुझें काय वेचे ॥

जगात पाहिले असता असे दिसते की, भगवंत हा सर्व जीवांना अन्न पुरवून त्यांचे पोषण करतो. त्याला सर्व जीवांची काळजी असते. हे मना, त्या भगवंतांचे फुकटचे नाम घेण्यास तुझे काय जाते ?

### श्लोक क्र. ९४

तिन्ही लोक जाळूं शके कोप येतां ।
निवाला हरू तो मुखें नाम घेतां ।
जपे आदरें पार्वती विश्वमाता ।
म्हणोनी म्हणा तेंचि हें नाम आतां ॥

शंकराला राग आला तर तो तिन्ही लोकांना जाळून टाकू शकतो. पण त्याचा स्वतःचा दाह रामनामामुळे शमला. त्या रामनामाचा जप जगदंबा पार्वती मोठ्या आदराने करते. म्हणून तेच नाम आता आदराने म्हणा.

### श्लोक क्र. ९५

अजामेळ पापी वदे पुत्रकामें ।
तया मुक्ति नारायणाचेनि नामें ।
शुकाकारणें कुंटणी राम वाणी ।
मुखें बोलतां ख्याति जाली पुराणीं ॥

अजामिळ नावाच्या महापातक्याने अंतकाळी आपल्या नारायण नावाच्या मुलाला व्याकूळ होऊन हाक मारली. मुलाच्या निमित्ताने देवाचे नाम-मुखात आले, त्यामुळे त्याला मुक्ती मिळाली. एक गणिका आपल्या पोपटाला राम-नाम शिकवायची, त्यामुळे तिचा उध्दार झाला आणि त्यामुळे पुराणांनी तिची किर्ती गायली आहे.

बँकिंग साक्षरता

# ऑनलाइन व्यवहाराद्वारे पैसे गेल्यास

बँकेतून अथवा ऑनलाइन व्यवहाराद्वारे पैसे गेल्यास घाबरू नका; फक्त ' ५५२६०' हा नंबर डायल करा. काही मिनिटांत आपली रक्कम होल्डवर जाईल.

सायबर गुन्हेगाराने फसवल्याचे कळताच त्वरित १५५२६० या क्रमांकावर कॉल केल्यास सायबर यंत्रणा कामाला लागते आणि अवघ्या सात ते आठ मिनिटांत ट्रान्सफर झालेली रक्कम होल्ड केली जाते. कारण, गुन्हेगार पैसे चोरी करण्यासाठी अनेक खात्यांचा वापर करीत असतात. कॉल येताच संबंधित बँक अथवा ई-साईटला अलर्ट केले जाते. त्यामुळे ट्रान्सफर सुरू असतानाच पैसे होल्ड केले जातात.

### यंत्रणा काम कशी करते ?

हेल्पलाइन क्रमांकावर कॉल येताच नाव, मोबाईल, खाते क्रमांक, पैसे वजा झाल्याची वेळ ही महत्त्वाची माहिती विचारली जाते. त्यानंतर सर्व माहिती http://cybercrime.gov.in/ या गृहमंत्रालयाच्या संकेतस्थळावरील डॅशबोर्डवर शेअर केली जाते. याकामी आरबीआयचेही सहकार्य मिळत आहे. क्राईम झाल्यानंतर पहिले दोन ते तीन तास अत्यंत महत्त्वपूर्ण असतात. आतापर्यंत अनेक नागरिकांना त्यांचे पैसे परत मिळाले आहेत.

### एकप्रकारचे सुरक्षा कवच

http://cybercrime.gov.in/ हे संकेतस्थळ आणि १५५२६० हा हेल्पलाइन क्रमांक म्हणजे एकप्रकारे सुरक्षा कवच आहे. याला 'इंडियन सायबर क्राईम कोऑर्डिनेशन प्लॅटफॉर्म' असेही म्हणतात. याच्याशी बँका, ई-वॉलेटस् ,पेमेंट गेटवेज, ई-कॉमर्स संकेतस्थळ आणि अन्य वित्तीय सेवा देणाऱ्या खुप संस्था जुळलेल्या आहेत.

★ ★ ★

## माहे मार्च दिनविशेष

३ मार्च – राष्ट्रीय सुरक्षा दिन
८ मार्च – आंतरराष्ट्रीय महिला दिन
१५ मार्च – जागतिक ग्राहक संरक्षण दिन
१६ मार्च – राष्ट्रीय लसीकरण दिन
२१ मार्च – जागतिक वन दिन
२२ मार्च – जागतिक जल दिन
२३ मार्च – जागतिक हवामान दिन, जागतिक क्षयरोग दिन
२६ मार्च – बांगला देश मुक्ती दिन

# हिंदू अविभक्त कुटुंब

## मृत्युपत्र



वंशपरंपरागत निधीतून आलेले उत्पन्न वैयक्तिक उत्पन्नात न मिळवता हिंदू अविभक्त कुटुंबाच्या विवरण पत्रात दाखवले तर आयकराची सूट आणि करदराचा फायदा मिळतो. सुरुवातीला हा निधि / पुंजी / भांडवल तीन स्रोतातून यायला हवा. रि-युनियन, गिफ्ट आणि इच्छापत्र,

रि-युनाइट म्हणजे एकाच पित्याच्या पुत्रांनी पुन्हा एकत्र येणे. पाण्यात कितीही जोरात काठी मारली तरी पाणी वेगळे होत नाही. पण आधीच वेगळी दुभंगलेली, कलुषित मने फक्त स्नेह संमेलना पुरतीच एकत्र येतात. हिंदू अविभक्त कुटुंब हा काही करार नाही. टॅक्सचा फायदा घेण्यासाठीच पुनर्मिलन झाले तर आयकर विभागाकडून एचयूएफ चा दर्जा रद्द केल्याची अनेक उदाहरणे आहेत.

मूळ रक्कम वाढवण्याचा दुसरा मार्ग म्हणजे पित्याच्या नात्यांकडून बक्षीस (गिफ्ट) घेणे. हल्ली मात्र कोणीही गिफ्ट देत नाही. गिफ्ट घेतली जाते. कॅश/बँक चेक गिफ्ट डीड साठी स्टॅम्पड्यूटी द्यावी लागत नाही. गिफ्ट देण्याचा उद्देश व्यवसाय विस्तार असावा. नाहीतर बक्षीस मिळालेल्या रकमेवर जे उत्पन्न असते ते बक्षीस देणाऱ्याच्या उत्पन्नात दाखवावे लागते.

आयकर कायद्यात फॅमिली सेटल करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे इच्छापत्र (विल). एखादा व्यवसाय सतत पुढे जावा अशी इच्छा मृत्यूपत्रात व्यक्त व्हावी. फॅमिलीचा कर्ता जॉइंट प्रॉपर्टीतल्या हिश्श्याचे विल करू शकतो. मृत्युपत्राद्वारे आपल्यानंतर कुटुंबाचा प्रमुख कोण असावा हा अधिकार कर्त्याला नाही. हिंदू वारसा कायद्याच्या कलम आठ प्रमाणे कर्त्याने मृत्यूपत्र केल्याशिवाय पुढच्या वारसदारांचे 'एचयूएफ' तयार होत नाही.

### पार्टीशन

सूर्य प्रकाश देतो पण अंधारही तोच पाडतो.वाटणीचेही तसेच आहे. हिंदू फॅमिली ही अमिबा प्राण्यासारखी आहे. मोठ्या अमिबाचे विघटन होवून पुन्हा छोटा अमिबा तयार होतो. हिंदू वारसा कायदा अंशतः पार्टीशनला मान्यता देतो. आयकर कायद्यात अंशतः विभागणी मान्य नाही. 'सुईच्या टोकावर मावेल एवढी जादा भूमी आपण आपल्याच सहृदयाला (चुलत भावंडाला) देवू शकत नाही' हे आयकर खात्याच्या लक्षात आल्यामुळे ३१ डिसेंबर १९७८ नंतर अंशतः पार्टीशन अमान्य केले. कलम १७१(९) नुसार हिंदू कुटुंबाचे पूर्ण पार्टीशन करावेच लागते. आयकर अधिकाऱ्यास तशी लेखी सूचना आणि पार्टीशन डीड देणे अनिवार्य आहे. वाटणी विषम प्रमाणात केली ती बेकायदेशीर नसते.

### बेनामी मालमत्ता आणि व्यवहार कायदा

हिंदू वारसा कायद्यात गर्भातील बालकास गर्भातून बाहेर जिवंत आल्यावर इस्टेटीमधील हक्क देत असतो. हिंदू अविभक्त कुटुंबाने सदस्याच्या नावाने प्रॉपर्टी केल्यास बेनामी होत नाही. सन २०१६ चा हा कायदा गैरव्यवहार निषिद्ध मानतो. मालमत्ता म्हणजे केवळ अचल संपत्ती किंवा रीयल इस्टेट नव्हे. यात गुंतवणूक, बँक खाते देखील येतात. करकायदे भावनेपेक्षा स्रोत आणि उद्देश शोधत असतात. उदा. आपण एकाच घरात राहणार म्हणून पती-पत्नी, पिता-पुत्र, आई-मुलगा, अशा जॉइंट नावाने एक प्रॉपर्टी घेतली तर चालेल, पण सासरा सून, आजोबा नातू, जावा- जावा, भविष्यात फार काळ एकत्र राहू शकणार नाही. असे गृहीत बेनामी व्यवहार होय.

कुटुंबातील मोठ्यांचा आदर करायचा म्हणून मुलाच्या बचतीतून कुटुंबाच्या नावाने प्रॉपर्टी करणे असे व्यवहार बँक कर्जासाठी आणि बेनामी व्यवहार कायद्यासाठी योग्य नाहीत. व्यावसायिक कौशल्य असणाऱ्या व्यावसायिकांनी (सीए किंवा वकील) कुटुंब कर्त्याचे पद उपभोगल्यास व्यावसायिक संघटनेकडून सभासदांवर शिस्तभंगाची कारवाई होवू शकते.

सारांश

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी देखील हिंदू कोड बिलाद्वारे एचयूएफ चे अस्तित्व मानले होते. समान नागरी कायद्याच्या वाटचालीत हिंदूंना वेगळी करसवलत ही मोठी अडचण ठरेल असे आयएफ पक्षाचे नेते असदुद्दीन ओवैसी म्हणतात. अनेक निवृत्त आयकर आयुक्तांच्या मते एचयूएफ एंटिटीचा गैरलाभ जास्त होत असतो. एचयूएफ ला दस्तऐवजातून मुक्ती आहे. पण वारसांची कुठेच नोंद नसल्यामुळे प्रॉपर्टीची विल्हेवाट लावणे अवघड जाते हे मुळशी पॅटर्न, सिंघानिया सन्स, अंबानी ब्रदर्स या उदाहरणाने लक्षात येते. भावंडांच्या वादात व्यवसाय संस्थेतील कर्मचारी आणि ग्राहक यांचे अतोनात नुकसान होते. म्हणून केरळ राज्यात हिंदू अविभक्त कुटुंबाच्या प्रॉपर्टीस १९७५ पासून मनाई केली आहे. मिळालेले उत्पन्न कुटुंबातील सदस्यांनी दरवर्षी वाटून घेतले तर खटले (लिटिगेशन) कमी होवू शकतात.

★ ★ ★ लेख समाप्त...

# ✻ विनम्र अभिवादन ✻

२१ मार्च रोजी आपल्या यशवंत बँकेचे संस्थापक माजी आमदार स्व.डॉ.श्री.कृष्णचंद्र भोईटे यांची पुण्यतिथी. राजकीय व सामाजीक जीवनात कार्यरत असताना महाराष्ट्राचे भाग्यविधाते पहिले मुख्यमंत्री स्व.यशवंतराव चव्हाण साहेबांच्या नावाने एखादी आर्थिक संस्था असावी या विचाराने त्यांनी मोठ्या प्रयत्नाने दि यशवंत को-ऑप. बँकेची स्थापना सन १९७५ साली फलटण येथे केली. यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना आपली हक्काची स्थानिक सहकारी बँक उपलब्ध झाली. त्यांच्या या दूरदृष्टीमुळेच आज आपली यशवंत बँक सातारा जिल्ह्यातील एक अग्रणी बँक म्हणून कार्यरत आहे. त्यांच्या पुण्यतिथी निमित्त बँकेचे संचालक, सल्लागार, सभासद, ठेवीदार, ग्राहक हितचिंतक यांचे वतीने विनम्र अभिवादन.

★ ★ ★







# ठेव संकलन अभियानाद्वारे एका महिन्यात झाली रु. १० कोटींची ठेव वाढ

## ठेव उद्दिष्ट पूर्ण करणाऱ्या कर्मचाऱ्यांना मिळाला भरगोस बोनस व पगारवाढ

# यशवंत सेवकांची दिवाळी आधीच दिवाळी

बँकेचे अध्यक्ष मा.शेखर चरेगांवकर यांनी बँकेतील सर्व कर्मचाऱ्यांना दिनांक २१ जानेवारी ते २१ फेब्रुवारी २०२२ या एका महिन्याच्या कालावधीत एकूण रुपये ७.५० कोटी संकलित करण्याचे उद्दिष्ट दिले होते. या आवाहनास सर्व सेवकांनी प्रतिसाद देत संकल्पाच्या पार जात एकूण रुपये १० कोटींचे ठेव संकलन पूर्ण केले. बँकेच्या इतिहासात प्रथमच एका महिन्यात इतके ठेव संकलन झाले आहे.

हे ठेव संकलन करीत असताना मा.संचालक मंडळाने ठेव उद्दिष्ट पूर्ण करणाऱ्या कर्मचाऱ्यास बोनस व पगारवाढ जाहीर केली होती. यामुळे उत्साहाने या अभियानात सहभागी होत ठेव संकलन करण्यात आले. हे उद्दिष्ट पूर्ण करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांना माहे फेब्रुवारी २०२२ च्या पगाराबरोबरच जाहीर करण्यात आलेला बोनस व पगारवाढ देण्यात आली. यामुळे सर्व कर्मचाऱ्यांत उत्साहाचे वातावरण असून दिवाळी आधीच दिवाळी साजरी झाल्याचा आनंद सर्वांना झाला आहे.

यानिमित्ताने हा आनंद द्विगुणीत करण्यासाठी ३ मार्च २०२२ रोजी श्रीकृष्ण व्हॅली रिसोर्ट, विंग येथे बँकेचे सर्व संचालक, सेवक व त्यांचे कुटुंबीय यांचा स्नेहमेळावा आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी उद्दिष्ट पूर्ण करणाऱ्या सर्व सेवकांचा व शाखांचा सन्मानचिन्ह देवून सत्कार करण्यात आला. यावेळी सर्व शाखा व्यवस्थापक व ठेव उद्दिष्ट पूर्ण केलेल्या सेवकांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमास बँकेचे सर्व संचालक मंडळ सदस्य, सेवक व त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते.



सन्मान चिन्ह



मार्गदर्शन - मा. शेखर चरेगांवकर साहेब



मार्गदर्शन - सौ. कल्पना गुणे मॅडम



मार्गदर्शन - प्रा. श्री. श्रीकृष्ण जोशी सर



प्रथम क्रमांक - शाखा कराड



द्वितीय क्रमांक - मुख्य कार्यालय




तृतीय क्रमांक - शाखा सातारा




चतुर्थ क्रमांक - शाखा फलटण



उपस्थित संचालक, सेवक वर्ग



उपस्थित संचालक, सेवक वर्ग

# सामाजिक जाणीव

सध्या एसटी महामंडळातील सेवकांचा संप चालू आहे. अनेक सेवकांना शासनाने निलंबित केले आहे. याचा विचार करून कामावर नसलेल्या या सेवकांना धान्य वाटप करण्याचा संकल्प बँकेने केला होता. श्री गोंदवलेकर महाराजांच्या जयंतीला बँकेच्या वतीने सर्वांना अन्नदानासाठी आर्थिक मदत करण्याचे आवाहन केले गेले. या आवाहनास समाजातील सर्व स्तरातून तसेच राज्यातील अनेक भागातून सर्वांनी प्रतिसाद दिल्याने हा संकल्प पूर्ण झाला. कराड आगारातील १०० एसटी कर्मचाऱ्यांना हे धान्य वाटप देण्यात आले. या शिधा कीटमध्ये पोहे, तेल, साखर, रवा, शेंगदाणे, मुगडाळ, तुरडाळ, तिखट, चहा पावडर, साबण असे साहित्य देण्यात आले. प्रातिनिधिक स्वरूपात बँकेत ५ जणांना धान्य कीट देण्यात आले. यावेळी उपस्थित एसटी कर्मचारी, बँक व्यवस्थापन मंडळाच्या अध्यक्षा सौ.कल्पना गुणे मॅडम, बँकेचे ज्येष्ठ सभासद प्रदीप इनामदार व अधिकारी वर्ग. या अन्नदान संकल्पासाठी मदत केलेल्या सर्व दात्यांचे आभार.

★ ★ ★












कथा

# क्षण आनंदाचे

सिकंदर भारत जिंकण्यासाठी आला असता एका निर्भेळ क्षणी एका खेडुत मुलीने त्यास सहजच प्रश्न विचारला, भारत जिंकल्यावर तुम्ही काय करणार? तो म्हणाला,पुढचे देश जिंकीन आणि मजल दरमजल असं जिंकून मी जगज्जेता होईन. मग काय करणार? हा प्रश्न पुन्हा त्या मुलीने विचारला. यावर तो म्हणाला,मग काय, निवांतपणे जगेन. यावर ती मुलगी खुदकन हसत म्हणाली, मग आतापासुनच का निवांत जगत नाहीस?

यातुन सिकंदरला काय कळलं माहीत नाही;पण खरंच ही कहाणी बरंच काही सांगुन जाते.आपणही असेच जगण्यातला निवांतपणा घालवून धावपळ करतोय ती पुढे कधीतरी निवांत जगू, या भाबड्या आशेवर.

बऱ्याचदा इतरांना मागे टाकण्याच्या नादात आपल्याला आपलं वळण कधी येऊन गेलं, याचं भानही रहात नाही.

कितीही वेगाने पळालो तरी आपल्यापुढे कोणीतरी असणारच, कोणाजवळ काहीतरी वेगळे असणारच, कोणालातरी जास्त संधी मिळणारच, कोणाचंतरी वलय आपल्यापेक्षा अधिक असणारच, कोणीतरी आपल्याहुन सुंदर असणारच हे आपणा विसरतो. तेव्हा, लक्ष आपल्या स्वाभाविक ध्येयावर आणि जगण्यावर केंद्रित करावं, आपली गती आपल्या प्रकृतीला साजेशी ठेवत आनंदाने जगत जावं; अन्यथा मित्र, नातेवाईक, सहकारी यांच्यापेक्षा आपण पुढे आहोत हे सिद्ध करण्याच्या नादात आपण आयुष्याला वेगळ्या दिशेला नेऊन ठेवतो. म्हणून केवळ एकटं पुढे रहाण्यापेक्षा सवंगड्यांसोबत थोडं मागे राहिलेलं उत्तम नाही का? अन्यथा बऱ्याचदा यामुळे विनाकारण असुरक्षिततेची भावना वाढते, करायच्या राहुन गेलेल्या गोष्टी आयुष्यात वैफल्य निर्माण करतात.

यासाठी पहिल्यांदा गरज आणि चैन यात फरक करणं नितांत गरजेचं आहे. इतर धावतायेत म्हणून आपणही धावणं ठीक नाही. जगणं हे राईसप्लेटसारखं असावं, त्यात कसं साऱ्या पदार्थांना आपापल्या मर्यादेत स्थान असतं आणि त्यामुळेच ते रुचकर ठरतं. जर चटणीची जागा भाजीला दिली, तर ताटाचं संतुलन बिघडतं आणि जेवणाचा गोंधळ उडतो. जगण्याचंही काहीसं असंच आहे, ते सर्वसमावेशक, चौफेर असेल, तर ते सुखकर ठरते. एखाद्या मोठ्या यशाच्या प्रतिक्षेत रोजच्या जगण्यातील छोटे छोटे आनंदाचे क्षण निसटुन जाऊ देऊ नका, ते क्षण तेव्हाचे तेव्हाच जगून घ्या, लुटून घ्या.

आपल्या आवडीच्या व आनंद देणाऱ्या गोष्टींसाठी आयुष्य पडलेय, हे पालुपद आयुष्यच कुरतडून टाकते, त्यामुळे ते क्षण वेचा. तारुण्यात शक्ती आसते, वेळ असतो, पण पैसा नसतो. पुढे शक्ती असते, पैसा असतो; पण वेळ नसतो आणि उतारवयात वेळही असतो, पैसाही असतो पण शक्ती उरत नाही.यातील सुवणमध्य गाठुन समरसुन जगावं.

स्टीव्ह जॉब्स म्हणतात, हरवलेल्या वस्तु गवसतील; पण वेळ नाही. आजारी पडून शस्त्रक्रियेच्या टेबलावर पोचल्यानंतर निरोगी कसं जगावं हे पुस्तक वाचुन काय उपयोग ?

बघा,आपलं असं होऊ नये...... ★★★

“बाहेरचे जग तसेच आहे
जसा आपण विचार करतो.
आपले विचारच गोष्टीला
सुंदर किंवा कुरूप बनवतात.”

क्षणचित्रे

# बँकेचा वेबसाईट उद्घाटन सोहळा

दिनांक ३ मार्च रोजी बँकेच्या स्नेह मेळाव्यामध्ये बँकेच्या नूतन अद्ययावत वेबसाईटचे उद्घाटन बँकेचे ज्येष्ठ संचालक प्रा.श्री.श्रीकृष्ण जोशी सर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. याप्रसंगी बँकेचे अध्यक्ष शेखर चरेगांवकर, बोर्ड ऑफ मॅनेजमेंट चेअरमन सौ.कल्पना गुणे यांच्यासह सर्व सन्माननीय संचालक, अधिकारी व नागरिक उपस्थित होते.

या वेबसाईटवर आपणास बँकेची सर्व प्रकारची माहिती प्राप्त होणार आहे. बँकेचा इतिहास, विद्यमान संचालक मंडळ, बँकेच्या विविध सेवा, ठेव योजना, कर्ज योजना, व्याज दर, सेवा शुल्क याची माहिती जाणून घेता येईल. डाउनलोड या ठिकाणी बँकेत बचत / चालू / मुदत ठेव खाते उघडण्याचा अर्ज, वारस नोंद अर्ज, चेकबुक मागणी अर्ज उपलब्ध करून देण्यात आला आहे.

फोटो गॅलरीमध्ये बँकेच्या आजवरच्या सर्व उपक्रमांचे फोटो अल्बम स्वरूपात पाहता येणार आहेत. संपर्क या ठिकाणी बँकेच्या मुख्य कार्यालयासह सर्व शाखांचे पत्ते, फोन नंबर, ईमेल आयडी, सर्व विभाग प्रमुखांचे संपर्क क्रमांक उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

वेबसाईट : www.yashwantbank.com

★ ★ ★







# यशवंत महोत्सव २०२२ ऑनलाईन पद्धतीने संपन्न
# १०,००० च्या वर श्रोत्यांनी घेतला घरबसल्या हनुमान कथेचा आनंद

दि यशवंत को-ऑप. बँकेच्या वतीने प्रतिवर्षी आयोजित होत असलेला यशवंत महोत्सव १ ते ६ मार्च २०२२ या कालावधीत संपन्न झाला. कोव्हीडच्या प्रादुर्भावामुळे अजूनही मोठ्या संख्येने जाहीर कार्यक्रम करण्यास प्रतिबंध असल्याने या वर्षी हा महोत्सव ऑनलाईन पद्धतीने आयोजित करण्यात आला.

यंदा महोत्सवाचे ११ वे वर्ष होते. कराड मधील ज्येष्ठ नागरिक व सामाजिक कार्यकर्ते श्री. किसनराव बाजीराव पाटील व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. सुशिला पाटील हे या वर्षीच्या महोत्सवाचे मुख्य प्रायोजक होते. या महोत्सवात राष्ट्रीय कीर्तनकार पंडित चारुदत्तबुवा आफळे यांची हनुमान कथा सादर झाली. बँकेच्या युट्यूब चॅनलच्या माध्यमातून घरबसल्या रोज सायंकाळी ६.३० ते ७.०० वाजता १०,००० च्या वर श्रोत्यांनी या कथेचा लाभ घेतला.

आपल्या अमोघ अशा वाणीने आणि कीर्तनीय सादरीकरणाने आफळे बुवांनी रसिक श्रोत्यांची मने जिंकत नवविधा भक्ती सांगत श्री हनुमानाचे चरित्र सादर केले. सलग ६ दिवस केवळ हनुमानाचे चरित्र कथा सादर करण्याचा हा पहिलाच प्रयोग होता. यांस श्रोत्यांनी रोजच्या वेळ वेळेवर ऑनलाईन उपस्थित रहात कथा श्रवण केली.

महोत्सवाबाबत अनेक ग्राहकांनी आपल्या प्रतिक्रिया दिल्या आहेत. त्या पुढील प्रमाणे :-

अतिशय सुंदर छान कीर्तन महोत्सव. मन प्रसन्न व तृप्त झाले आहे. - श्री.प्रभाकर मुद्गल

यशवंत बँकेस नमन. खूप खूप सुंदर उपक्रम. - श्री.तानाजी बेदाते

अतिशय सुंदर व प्रसन्न वातावरणात हनुमंत घरोघरी पोहचवले त्याबद्दल धन्यवाद. गर्दी नाही पण दर्दी मात्र मिळाले आहेत. - सौ.अर्चना कुलकर्णी

खूप सुंदर उपक्रम, बँकेचे सर्वच सामाजिक उपक्रम अतिशय स्तुत्य आहेत, हिच खरी समाजसेवा आहे, ईश्वराची कृपा आपल्या बँकेवर सदैव राहो हिच ईश्वर चरणी प्रार्थना!!! आयोजकांचे मनःपूर्वक धन्यवाद!!!
- श्री.शरद जगदाळे

यशवंत बँकेने घरबसल्या अशा सुश्राव्य कीर्तनाचा लाभ प्राप्त करून दिला, त्याबद्दल
आयोजकांचे मनःपूर्वक आभार - सौ.नंदिनी चव्हाण

चारुदत्तजींचं कीर्तन. प्रवचन म्हणजे आध्यात्मिक प्रबोधनच असतं. त्यांना प्रणाम! तसंच आयोजकांनाही धन्यवाद! - सौ.मीरा दीक्षित

छान! यशवंत बँकेने घरी बसून कीर्तनपर्वणी लाभ दिला! धन्यवाद! - श्री.हरी घळसासी

अवर्णनीय, सुंदर उपक्रम. खुप छान ज्ञानात भर पडली, धन्यवाद... - श्री.अजय गिजरे

आज कीर्तन सोहळा पुर्ण झाला. मी स्वतः चारुदत्त आफळे यांचा चाहता आहे. वाई येथे कीर्तन सोहळा पाहण्यास जात होतो. यावेळी आपण सहा दिवस ऑनलाईन पद्धतीने साजरा केलात कान तृप्त झाले. घर बसल्या हा आनंद मिळाला, आभारी आहे.
- श्री.दिलिप इनामदार

यशवंत महोत्सवातील हनुमान कथेचे सर्व भाग बँकेच्या युट्यूब चॅनेलवर व फेसबुक पेजवर उपलब्ध आहेत. आपण तेथे या कथेचा लाभ घेऊ शकता.
युट्यूब लिंक -
https://youtube.com/channel/UCoT25kUXpoLrryzSYgJtqwA
फेसबुक पेज लिंक -
https://www.facebook.com/YashwantBank/
संपर्क - 7030666601

# यशवंत महोत्सव २०२२






प्रायोजक सन्मान – श्री. किसनराव व सौ. सुशिला पाटील



मनोगत – श्री. किसनराव पाटील



मनोगत – श्री. शेखर चरेगांवकर



कथा ऐकताना सन्माननीय संचालक वर्ग



सामुदायीक हनुमान कथा श्रवण

## * सन्मान कर्तृत्वाचा *



आपल्या बँकेचे सातारा शाखेचे ग्राहक श्री.सागर माने हे सीए (चार्टर्ड अकौटंट) परीक्षेमध्ये घवघवीत यश संपादन करून परीक्षा उत्तीर्ण झाले. या यशाबद्दल त्यांना बँकेच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी सौ.वैशाली मोकाशी मॅडम व वसुली अधिकारी श्री.सुजित पवार व सातारा शाखेतील सर्व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत शुभेच्छा देण्यात आल्या.

## * जागतिक महिला दिन *

आज जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत आपल्या यशवंत महिला स्वयंरोजगार प्रतिष्ठान, कराड संचलित धपाटा हाऊसच्या माध्यमातून Ready to Eat (२९ पदार्थ) आणि Ready to Cook (१३ पदार्थ) सुरु करण्यात आलेले आहेत.

बँकेच्या सभासद सौ.गिरीजा शेखर चरेगांवकर यांच्या शुभहस्ते व बँक व्यवस्थापन मंडळाच्या अध्यक्षा सौ.कल्पना गुणे मॅडम यांच्या अध्यक्षतेखाली तसेच बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौ.वैशाली मोकाशी यांच्या प्रमुख उपस्थितीत या उप्रक्रमाचे उदघाटन करण्यात आले. यावेळी बँकेतील महिला अधिकारी व कर्मचारी वर्ग, महिला उद्योजिका, धपाटा हाऊसच्या संचालिका सौ.सामानी ह्या उपस्थित होत्या. पुणे, मुंबई सारख्या मोठ्या शहरांनंतर कराडमध्ये प्रथमच अशा पदार्थांची उपलब्धी कराडकरांना होत आहे.








# बँकेच्या खास ठेव योजना

Reg.No. SAT/BNK/27/1975

## दि यशवंत को-ऑप. बँक लि., फलटण

'आपली गुंतवणूक सुरक्षितता केवळ बँकेतच, कारण येथे आहे कुटुंबातील प्रत्येकाला, रूपये ५ लाखांचे ठेव विमा संरक्षण..'



मा. शेखर चरेगांवकर
अध्यक्ष, दि यशवंत बँक लि., फलटण

### * ठेवींवरील व्याजदर *

| अ.नं. | ठेव प्रकार | मुदत | व्याजदर |
|---|---|---|---|
| १ | सेव्हिंग्ज ठेव | | ३.५० % |
| २ | स्पेशल सेव्हिंग्ज् ठेव | | ६.५० % |
| ३ | चिरंजिव सेव्हिंग्ज् ठेव | | ३.५० % |
| ४ | पिग्मी ठेव | | ३.०० % |
| ५ | सुपर फ्लेक्सी ठेव | | ५.०० % |
| ६ | अल्प मुदत | किमान १६ दिवस ते ९० दिवस | ५.५० % |
| ७ | अल्प मुदत | ९१ दिवस ते १८० दिवस | ५.७५ % |
| ८ | अल्प मुदत | १८१ दिवस ते ३६४ दिवस | ६.०० % |
| ९ | मध्यम मुदत | १ वर्ष | ७.२५ % |
| १० | मध्यम मुदत | १३ महिने ते २४ महिने | ७.७५ % |
| ११ | मध्यम मुदत | २५ महिने ते ६० महिने | ८.०० % |
| १२ | मासीक व्याज योजना | ३ वर्षे व पुढे | ८.२५ % |
| १३ | मधुमित्र योजना | ३ वर्षे व पुढे | ८.२५ % |
| १४ | आधार (जेष्ठ नागरीक) | ३ ते ५ वर्षे | ८.५० %* |
| १५ | दामदुप्पट ठेव | | ८ वर्षे |
| १६ | दामदिडपट ठेव योजना | | ४ वर्षे २ महिने |

'अ' वर्ग सभासद किंवा जेष्ठ नागरीक यांना १ वर्ष व त्यापुढील कालावधीकरीताच्या ठेवींना ०.२५ टक्के जादा व्याजदर

सर्व शाखांमध्ये सकाळी १० ते सायंकाळी ६ पर्यंत कॅश सुविधा देणारी बँक

अधिक माहितीसाठी आजच आपल्या नजीकच्या शाखेला अथवा ग्राहक सेवा केंद्राला भेट द्या...

| शाखा फलटण | शाखा कराड | शाखा सातारा |
|---|---|---|
| डॉ. आंबेडकर चौक, फलटण | चावडी चौक, कराड | तांदुळआळी, सातारा |
| 8408802022 | 7875558491 | 9049633555 |

www.yashwantbank.com admin@yashwantbank.com

* ग्राहक सेवा हा आमचा विभाग नसून स्वभावच आहे. *

### सुपर 6 रिकरिंग ठेव योजना

सुपर 6

मुदत ६ महिने

- दरमहा किमान रू. १०००/-

### विद्यालक्ष्मी आवर्त ठेव योजना

मुलांच्या शिक्षणासाठी अनोखी रिकरींग ठेव योजना
आपल्या पाल्यांचे शैक्षणिक भविष्य आजच सुरक्षित करूया.

### कुबेर मनी प्लस

मुदत ५ वर्षे

| दरमहा रक्कम | मिळणारी रक्कम | दरमहा रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|---|
| रू. 135/- | 10,000/- | रू. 680/- | 50,000/- |
| रू. 340/- | 25,000/- | रू. 1360/- | 1,00,000/- |

**धन संचय** — दरमहा रू. १००/- व त्या पटीमध्ये मुदत १ ते ५ वर्षे (अपघाती विमा संरक्षण रू. ५० हजार)

**अमृत संचय** — दरमहा रू. ५००/- भरा व ६ वर्ष ६ महिन्यांनी घ्या रू. ५०,०००/- (अपघाती विमा संरक्षण रू. ५० हजार)

**सुवर्ण संचय** — दरमहा रू. १०००/- भरा व ६ वर्ष ६ महिन्यांनी घ्या रू.१,००,०००/- (अपघाती विमा संरक्षण रू. १ लाख)

### मासिक व्याज योजना (MIS)

- मुदत ३ ते ५ वर्ष
- व्याजदर ८.५०% (दरमहा उत्पन्नाची हमी)
- ज्येष्ठ नागरिक वय - ५५ वर्षे

ज्येष्ठ नागरिकांचे सन्मानार्थ

### स्वराज्य ७५ संजीवनी ठेव योजना

लसीकरण प्रोत्साहनासाठी १३ महिने मुदतीची

| | |
|---|---|
| १ लस घेतलेल्या नागरीकांसाठी | व्याजदर ८.२५% द.सा.द.शे |
| २ लस घेतलेल्या नागरीकांसाठी | व्याजदर ८.५०% द.सा.द.शे |
| लस न घेतलेल्या नागरीकांसाठी | व्याजदर ८.००% द.सा.द.शे |

### महालक्ष्मी ठेव योजना

| | |
|---|---|
| १५१ दिवस | ७% |
| २५१ दिवस | ७.२५% |

### सभासद आरोग्य वर्धिनी योजना

एकरकमी दरवर्षी रू. १०००/- शेअर्स घेणाऱ्या सभासदांकरीता
सुरक्षितता... ठेवींबरोबर आरोग्याचीही..

* ज्येष्ठ नागरिकांना घरपोहोच बँकींग सेवा... *



10 कोटी

# घर तुमचं हक्काचं... तुमचं स्वतःचं...

# गृहप्रवेश

## गृहबांधणी/खरेदी कर्ज योजना

नवीन फ्लॅट खरेदीसाठी/घर बांधणीसाठी/जुना फ्लॅट/घर खरेदीसाठी
तुमच्या सध्याच्या घराच्या दुरूस्तीसाठी/विस्तारासाठी
एन. ए. प्लॉट खरेदी व बांधकाम दोन्हीसाठी

प्रति लाखास
₹ १२००/-

मुदत
१५ वर्षे

कमाल मर्यादा
₹. ५० लाख

**पात्रता :**
व्यावसायिक – वार्षिक उत्पन्नाच्या ४ पट
पगारदार – निव्वळ मासिक पगाराच्या ६० पट
शेती – वार्षिक उत्पन्नाच्या ४ पट

**उत्पन्न कागदपत्रे :**
व्यावसायिक – गत ३ वर्षाची आयकर विवरण पत्रके
पगारदार – पगारपत्रक, हमीपत्र
शेती – शेती उत्पन्नाची कागदपत्रे, बँक स्टेटमेंट

**आवश्यक कागदपत्रे :**
मिळकतीशी संबंधित अद्ययावत कागदपत्रे,
७/१२ उतारा, सिटी सर्वे उतारा,
मूल्यांकन अहवाल

**कायदेशी बाबी :**
शोध अहवाल, कायदेशीर मत
आर्थिकदृष्ट्या सक्षम २ जामीनदार
आर्थिक कागदपत्रांसहीत.



# गाडी कोणतीही घ्या... अर्थसहाय्य आम्ही करू...!

## दुचाकी / चारचाकी वाहन खरेदीसाठी

# सुहाना सफर कर्ज योजना

प्रति लाखास
₹ २२२५/-

२४ तासात कर्ज उपलब्ध

100 %
पर्यंत कर्ज उपलब्ध







**आवश्यक कागदपत्रे :**
गाडीचे कोटेशन, मुल्यांकन रिपोर्ट

**आर्थिक कागदपत्रे :**
व्यावसायिक – गत ३ वर्षाची आयकर पत्रके
पगारदार – पगारपत्रक हमीपत्र
शेती – शेती उत्पन्नाची कागदपत्रे
आर्थिकदृष्ट्या सक्षम २ जामीनदार.



10 कोटी